# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

"वनभवन" , रामगिरी रोड, पोलीस जिमखान्याजवळ, सिव्हील लाईन, नागपूर-440 001

दुरध्वनी क्रमांक-0712 2556937,2555673 फॅक्स क्रमांक 0712-2550675, E-mail : apccfprotection@mahaforest.gov.in


क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २५ /३६७ / १८-१९
नागपूर-४४० ००१, दिनांक ११ /१२/२०१८

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नागपूर/मुंबई, कांदळवन मुंबई

-------------

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व

-------------

मुख्य वनसंरक्षक व वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व

**विषय:- वनवणव्या बाबत उपाय योजना.**

संदर्भ:-१. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२७६/१२५२/१५-१६, दिनांक १५/०१/२०१६.
२. प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) म.रा. नागपूर यांचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२१/४७०/१६-१७, दिनांक १३/०१/२०१७
३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-१८/दक्षता/प्रक्र. २१/६४७, दि. २१/०३/२०१८.
४. शासन पत्र क्रमांक संकीर्ण-०३/२०१८/प्र.क्र.७८/फ-६, दिनांक २७ नोव्हेंबर २०१८

उपरोक्त संदर्भिय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

वनांची अवनति (Degradation) करिता वनांची कटाई, चराई इत्यादी सोबत सामान्यत: माहे 15 फेब्रुवारी ते 15 जुन पर्यत लागणारे वनवणवे सुध्दा कारणीभूत आहेत. या वनवणव्यामध्ये जमिनीच्या पृष्ठ भागावर असणारी हयुमस, लहान झुडपे (Herbs), मोठी झुडपे (Shrubs), गवत, महत्वाची वनौषधी, तसेच नैसर्गिक पुनर्निर्मिती जळुन नष्ट होते. वनवणव्यामध्ये पुनर्निर्मिती नष्ट झाल्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता कमी होते.

दरवर्षी वनांचे आगी पासुन संरक्षण करण्यासाठी आगीचा मोसम सुरु होण्यापूर्वी वनवणवा प्रतिबंधक उपाययोजना तयार करण्यांत येतात. त्यानुसार जाळरेषा आखुन वनक्षेत्राचे लहान लहान भागात विभाजन करणे, आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अग्निरक्षकाची नेमणुक करणे, आगीवर निगरानी ठेवण्यासाठी योग्य स्थळाची निवड करणे, वनक्षेत्रामध्ये आग लागु नये म्हणुन वनक्षेत्राची नियमित गस्त करणे, जाळरेषा घेणे, आग लक्षात येताच स्थानिक गावक-यांच्या मदतीने लागलेली आग विझविणे, दुरदर्शन/आकाशवाणी व इतर माध्यमातून वनांमध्ये लागलेल्या वनवणव्याच्या वाईट परिणामाबाबत ग्रामस्थांमध्ये जागरुकता निर्माण करणे, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे आग प्रतिबंधक उपाययोजना राबविण्यासाठी तसेच आग विझविण्यासाठी सहकार्य घेणे व आगीच्या हंगामात माहितीची देवाण/घेवाण सत्वर करणे इत्यादी उपाययोजना वनातील आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमितपणे आखल्या जातात. तरीपण दरवर्षी जंगलामध्ये आग लागण्याच्या घटना मोठया प्रमाणात घडत असुन त्यावर अतिरिक्त परिणामकारक उपाययोजना आखणे व त्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे.

१ त्याअनुषंगाने वनवणवा सप्ताह (Fire Week) १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी या कालावधीत आयोजीत करण्यात यावा. वनवणवा सप्ताह मध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी व वनपाल यांनी ग्राम प्रतीनिधीसोबत आगीच्या दृष्परिणामाबाबत गावागावात व प्रामुख्याने संवेदनशिल क्षेत्रातील गावात सभा आयोजित करुन जनजागृती करणे. वनसंरक्षणासाठी लोकांचे प्रबोधन करणे. पर्यावरणातील विपरीत परीणामाबाबत व शासन संपत्तीचे नुकसान टाळणे बाबत सहकार्य मिळविणे. या दृष्टीकोनातून जनतेमध्ये विश्वासाचे वातावरण निर्मित करावे.

क्षेत्रिय कर्मचारी, वनव्यवस्थापन समिती, सदस्य व वनमजुर आग विझविण्यासाठी स्थानिक लोकांना आगीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, संवेदनशिल क्षेत्र गावानुसार समजावुन सांगणे, संदेश वहणाची देवाण-

घेवाण, वनपरिक्षेत्रवार केंद्रस्थ अधिकारी/वनपरिक्षेत्र अधिकारी पर्यंत तात्काळ पोहचण्याची व्यवस्था करणे, संवेदनशिल क्षेत्रात वनवणवा हंगामात नागरीकांना जाण्यास मज्जाव करणे याबाबत जन जागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात यावा व जाणुन बुजून आग लावणा-या आरोपीची माहीती कळविणा-या व्यक्तीस बक्षीस रुपात प्रवृत्त करावे.

वनाधिकारी यांनी वनवणवा आपत्ती व्यवस्थापन योजना-२०१९ नुसार पुर्वतयारी झाली आहे, याची खात्री करावी. आगीवर नियंत्रण त्वरीत होण्याकरीता प्रशिक्षित "फायर फायटींग पथक" मौक्याच्या ठिकाणीआग विझवण्याच्या व सुरक्षेच्या साहित्यासह तयार आहे, याची खात्री करावी. आग लागण्याचे संभाव्य ठिकाणाचे नकाशे वनपरिक्षेत्र अधिकारी व कर्मचारी पर्यंत देण्यात आले आहेत, याची खात्री करुन वनवणवा सप्ताह आयोजीत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करावा.

२ शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-01/2006/प्रक्र.39/फ-6, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक 5/6/2008 अन्वये आगीच्या मोसमात ( दिनांक 15 फेबुवारी ते 15 जुन) इतर शासकीय विभागाची वाहने अधिग्रहीत करुन वनविभागास देण्यासाठी महसुल आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच वनवणवा आटोक्यात ठेवण्यासाठी प्रत्येक महसुल आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली (नागपूर/अमरावती/ठाणे/नाशिक/पुणे व औरंगाबाद) समिती गठीत करण्यास शासनाने मान्यंता दिलेली आहे. सदर समितीची बैठक आगीच्या हंगामात म्हणजे दिनांक 15 फेबुवारी ते 15 जुन पर्यंत प्रत्येक महिन्यात एक वेळा खालील विषयावर आयोजित करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

- आगीच्या मोसमात वनविभाग व इतर शासकीय विभागामध्ये समन्वय निर्मित करण्याचे दृष्टीकोनातून समन्वय समितीचे बैठकीत चर्चा करुन वनवणवा नियंत्रणात ठेवण्यासाठी उपाययोजना सुचविणे.
- उपवनसंरक्षक यांचे पातळीवर तयार करण्यांत आलेल्या वनवणवा प्रतिबंधात्मक योजनेचा आढावा घेणे. आग लागण्याचे कारणांचे पृथक्करण करुन नवीन उपाय योजना सुचविणे.
- आगीच्या हंगामात लागणा-या अतिरिक्त वाहनाबाबत चर्चा करुन तसेच इतर शासकीय विभागाची वाहने अधिग्रहीत करुन वन विभागास पुरवठा करण्याचे निर्देश देणे. वाहनाचे वापराबाबत आढावा घेणे.
- जाणुनबुजून आग लावली असेल तर अशा ठिकाणी संबंधितावर भारतीय वन कायदा व भारतीय दंड संहिता अंतर्गत कार्यवाही करण्याबाबत वस्तुस्थितीचे विश्लेषण करुन निर्णय घेणे व सदर निर्णय कार्यान्वित करण्यासाठी निर्देश देणे.

३ पर्यावरण व वनमंत्रालय, देहरादून यांचेकडील पत्र क्रमांक 22-244/2010-NFDMC-दिनांक 17 मार्च, 2010 अन्वये भारतीय वन सर्व्हेक्षण यांच्या माध्यमातून 18 मार्च, 2010 नंतर उपग्रहामार्फत निदर्शनांस आलेल्या आगी संबंधात जळीत क्षेत्राची प्रत्येक जिल्हयाची माहीती अक्षांश, रेखांशा सह भारतीय वन सर्व्हेक्षण यांच्या www.fsi.nic.in या संकेत स्थळावर रोज दुपारी 12.00 वाजता प्रदर्शीत (Upload) करण्यांत येत आहे. तसेच SMS द्वारे देखील संबंधित उपवसंरक्षक यांना भारतीय वन सर्व्हेक्षण यांनी ही सुविधा सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील प्रमाणे संकेत स्थळावर व SMS व्दारे प्राप्त होणा-या आगीच्या घटनावर आपल्या कार्यालयातील नेमणुक केलेल्या केंद्रस्थ अधिकारी यांनी दररोज प्रदर्शित होणा-या घटनांचा वास्तविक स्थीती (Ground Verification) अहवाल संकलित करुन या कार्यालयास सादर करण्याच्या सुचना देऊन सुध्दा मागील दोन वर्षाचा अनुभव समाधान कारक नाही.

परंतु FSI देहरादून, संकेत स्थळावर बीटवार आगीच्या घटना प्रदर्शित करीत आहे. आगीच्या घटनाची ईमेज आगीचा भडका झाल्याशिवाय सॅटेलाईट ईमेज घेत नाही. त्यामुळे दर्शविलेल्या ठिकाणी/बीटात आग लागलीच नाही असे म्हणणे संयुक्तीक नाही. आपण मासिक अहवालात दर्शविलेल्या घटना व FSI च्या संकेत स्थळावर दर्शविलेल्या घटना या मध्ये फार मोठया प्रमाणात तफावत आहे. याचाच अर्थ संकेत स्थळावर प्राप्त होणा-या घटनानुसार क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी दखल घेत नाही, क्षेत्रीय तपासणी करीत नाही. त्यांना त्यांच्या निदर्शनास येणा-या अथवा स्थानिक स्तरावरुन आगीच्या घटनांची प्राप्त माहीतीच्या आधारे घटनांची दखल घेत असल्यामुळे मासिक अहवालात अचुक माहीती प्राप्त होत नाही. याचाच अर्थ क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी अशा गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करीत आहे असे दिसुन येते. याची संपूर्ण जबाबदारी केंद्रस्थ अधिकारी यांची असुन त्यांनी तात्काळ रोजच्या रोज दखल घेणे आवश्यक आहे. मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, पश्चिम झोन, पुणे यांनी दिलेल्या निर्णयानुसार त्यांचे आदेशाची अवमानणा होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

४ भारत सरकार पर्यावरण व वनमंत्रालयाचे अतिरिक्त महासंचालक वने यांनी वनवणवा आपातकालीन व्यवस्थापन आराखडा (Crisis Management plan in respect of Ministry of Environment & Forests- regarding) तयार करुन सादर करण्याच्या सुचना त्यांचे पत्र क्रमांक 1-6/2006/FPD दिनांक 29/1/2010 अन्वये प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार वनवणवा हंगाम कामे सुरु होण्यापूर्वी माहे ऑक्टोंबर पर्यत केंद्र शासनास आराखडा सादर करावयाचा असतो. तसेच हंगाम संपल्याच्या नंतर आराखडयानुसार आगीवर झालेले नियंत्रणाबाबत मुल्यांकन अहवाल सादर करण्याच्या सुचना आहेत.

त्यानुसार विहीत कालावधीत आपातकालीन व्यवस्थापन आराखडा व नियंत्रण मुल्यांकन अहवाल सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी.

५ आगीपासुन वनांचे संरक्षण करण्याबाबत स्थायी आदेश, या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-18/दक्षता/प्रक्र.204/2000.01/210, दिनांक 22 मे, 2001 अन्वय्रे मुख्य वनसंरक्षक/वनसंरक्षक (सर्व) यांना जारी करण्यांत आला आहे. त्यामध्ये वनवणवा 24 तासात आटोक्यात आणण्याबाबत, पंचनामा व्यवस्थीत करण्याबाबत, पंचनामा पोलीस स्टेशनला चौकशीसाठी पाठविण्याबाबत, अनोळखी व्यक्तींना वनक्षेत्रात प्रवेश करण्यासाठी मज्जाव करण्याबाबत, कायद्याअंतर्गत आरोपीवर कार्यवाही करण्याबाबत इत्यादी बांबीचा समावेश आहे.

६ मा. मंत्री वने यांनी दिनांक 7 एप्रिल 2005 रोजी नागपूर येथे वनाधिका-यांच्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार वनवणव्याचे संदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी विदर्भातील वनक्षेत्राकरीता व पश्चिम महाराष्ट्राकरीता वनवणवा समित्या गठीत करुन समितीचे अहवाल शासनाने त्यांचे पत्र क्रमांक संकिर्ण-01/2006/प्रक्र.39/फ-6, दिनांक 10 जुलै,2006 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-18/दक्षता/प्रक्र.27(05.06)/119, दिनांक 7 एप्रिल 2007 अन्वये शिफारशींची अमलबजावणी करण्याबाबत आपणास कळविण्यांत आलेले आहे.

७ तेंदु हंगामात आगीपासुन वनाचे संरक्षण करण्याबाबत निर्गमित केलेले ज्ञापन क्रमांक कक्ष-20(2)/प्रक्र.21(12.13)/1609/12.13, दिनांक 11/2/2013 अन्वये दिलेल्या सुचना नुसार तेंदु हंगामात आगीवर नियंत्रण ठेवण्याबाबत अमलबजावणी करण्यांत यावी.

८ मा. राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरण, पश्चिम झोन, पुणे यांनी मुळ अर्ज क्रमांक 135/2013 मध्ये दिनांक 19/11/2013 रोजी सुनावणी होवून दिनांक 19/11/2013 च्या आदेशान्वये सदर न्यायालयीन प्रकरण निकाली काढलेले आहे. त्यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार खालील महत्वाचे मुद्यावर आवश्यक कार्यवाही करण्यांत यावी.

- वनवणवा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे. वनवणवा हंगामात वनवणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर G.P.S., Fire beaters, Fire brooms, Fire rakes, Motor vehicle sets, Watch Towers उपयोगात आणणे. तात्पुरत्या स्वरुपात Fire watchers नियुक्ती करणे, वनवृत्त / विभागीय पातळीवर नोडल फायर ऑफिसर नेमणूक करणे, इत्यादी
- जनहित रक्षण कायदा 1991 (Public Liability Insurance Act,1991) च्या तरतुदीनुसार तेंदु पत्ता हंगामात लागलेल्या आगीबाबत तेंदु ठेकेदार यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे (त्यासंबंधी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अकाष्ठ वनोपज, सनियंत्रण व मुल्यांकन) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेशी संपर्क करुन कार्यवाही करणे.)
- निरनिराळया वनसंवर्धन, वनसंरक्षण, व्यवस्थापन आराखडा व नियमावली अंतर्गत नमुद केलेल्या तरतुदी नुसार वनवणवा नियंत्रणासाठी उपग्रह द्वारे संकेत स्थळाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करणे.
- वनवणवा प्रतिबंधक उपाय योजना संबंधी इतर आवश्यक कार्यवाही करणे.
- आगीच्या घटना, जळीत क्षेत्र व झालेले नुकसान याबाबतची माहीती वनविभागाचे संकेत स्थळावर वेळोवेळी टाकण्यांत यावी. व ती प्रत्येक तिमाहीत अदयावत करण्यांत यावी.

वरील न्यायाधिकरण निर्णयाच्या आदेशानुसार वरीलप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत आपले अधिनस्त संबंधीत अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांना निर्देश द्यावेत व त्याबाबत वेळोवेळी आढावा घेण्यांत यावा. न्यायालयीन आदेशाची अवहेलना होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

९ शासन परिपत्रक क्रमांक एफडीसी-2014/प्रक्र.137/फ-5, दिनांक 24/09/2014 अन्वये वनसंरक्षणाचे बळकटीकरण व आगीपासून संरक्षण करणे संदर्भात प्रत्येक संबंधीत वनसंरक्षक/मुख्य वनसंरक्षक यांनी त्यांचे अधिनस्त क्षेत्रातील FSI च्या रिपोर्ट प्रमाणे 10% क्षेत्राची तपासणी स्वत: करणे बाबत निर्देश दिलेले आहे. त्यावर कार्यवाही अपेक्षित आहे.

१० महाराष्ट्र वन नियमावली 2014 मधील नियम 3 ते 8 व नियम 24 अन्वये राखीव व संरक्षित वनांचे आगीपासून संरक्षण करणेच्या तरतूदी नमुद केल्या आहेत. त्या नुसार आणि केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे शासन निर्णय/निर्देशान्वये अमलबजावणी वेळीच होणे अपेक्षित आहे. त्याकरीता शासनामार्फत मोठया प्रमाणात विविध योजना करीता दरवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यांत येतो. परंतु आगीच्या घटनामध्ये मोठया प्रमाणात घट झाल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे लागलेल्या आगी संदर्भात दरवर्षी दैनिक वृत्तपत्र, प्रसार माध्यमातुन प्रसिध्दी होवून वनविभागाची प्रतिमा खराब होत आहे. व त्याचे

परिणाम, विधानसभा, लोकसभा, तारांकित/अतारांकित, लक्षवेधी प्रश्न उपस्थीत होवून येणा-या अडचणी दिवसेंनदिवस वाढत आहे.

११ त्या अनुषंगाने शासन निर्णय क्र. संकीर्ण-०५/२०१६/प्र.क्र.९५(भाग-२)/फ-६, दि.१९ नोव्हेंबर, २०१६ अन्वये वनक्षेत्रात लागणा-या आगीबाबत वनवणवा नियंत्रणासाठी आधुनिक पध्दती व कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून आराखडयात निवड केलेल्या ४० वनविभागाकरीता आधुनिक पध्दतीव्दारे कृती आराखडयानुसार अंमलबजावणी करण्याकरीता या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१८/दक्षता/प्र.क्र.२१ (१६-१७)/३७३/२०१६-१७, दि.२१ नोव्हेंबर, २०१६ अन्वये संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक/वन्यजीव) व वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व यांना पाठविण्यात आलेला आहे. कृती आराखडयात दिलेल्या निर्देशान्वये कार्यवाही अपेक्षित आहे. तसेच कृती आराखडयानुसार कार्यवाही करीता महाव्यवस्थापक उत्तर चंद्रपुर प्रदेश, चंद्रपुर एफडीसीएम लिमीटेड चंद्रपूर यांचे मार्फत वनअधिका-यांना प्रशिक्षक म्हणुन प्रशिक्षण दिनांक ९ व १० जानेवारी, २०१७ रोजी देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने वनवृत्तांत सर्व स्तरावर प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम माहे जानेवारी-२०१७ अखेर पर्यंत पुर्ण करुन आधुनिक पध्दतीव्दारे अंमलबजावणी करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहे. तरी सुध्दा सन २०१७ व २०१८ मध्ये आगीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. त्याची कारणे शोधणे अपेक्षित आहे.

वरील पार्श्वभुमीवर आपणास विनंती करण्यांत येते आहे की, आपल्या वनवृत्तामध्ये उपलब्ध सर्व साधन सामुग्री, मनुष्यबळ यांचे सुनियोजन करुन, तसेच इतर संबंधित विभागाशी समन्वय साधुन आगीवर नियंत्रण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावा. आगीच्या हंगामात ज्या विभागात वनपरिक्षेत्रात एकुण वनक्षेत्राच्या 1.00% पेक्षा जास्त क्षेत्र जळाल्याचे आढळल्यास उपवनसंरक्षक/उप विभागीय वनअधिकारी/सहाय्यक वनसंरक्षक/वनपरिक्षेत्र अधिकारी हे सर्वस्वी जबाबदार राहतील आणि त्यांना शिस्तभंग विषयक कार्यवाहीचे समोर जावे लागेल, याबाबत अधिनस्त सर्व अधिका-यांना जाणीव करुन दयावी. वरील सर्व शासन निर्णय शासन परीपत्रक यापुर्वीच आपणास पाठवियात आलेले आहेत. त्याचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही कार्यवाही करण्यात यावी. आगीसंबंधाने केलेल्या उपाययोजना बाबत वेळोवेळी आढावा घेण्यात यावा. केंद्र शासनास व राज्य शासनास वेळोवेळी सादर करावयाचे अहवाल विहित मुदतीत सादर करावे. तसेच वरील प्रमाणे आदेशाची अंमलबजावणी करण्यांत यावी आणि येत्या हंगामात आगीवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवावे.

**अ.प्र.मु.व.स. (संरक्षण ) यांचे कडून मान्य मसूदा**

(एस.डब्ल्यु.नाईक)
विभागीय वन अधिकारी (संरक्षण)
प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) महाराष्ट्र राज्य,
नागपूर, यांचे कार्यालय

11/12/18
व-स्था-१९

**प्रतिलीपी:-** मा. सचिव (वने), महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई-३२, यांना माहीतीस सविनय सादर.
**प्रतिलीपी:-** मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस सादर.
**प्रतिलीपी:-** मा.प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहीतीस सादर.
**प्रतिलीपी:-** मा.व्यवस्थापकीय संचालक वनविकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहीतीस सादर.
**प्रतिलीपी:-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक/ कॅम्पा /अकाष्ठ वनोपज/संधारण/संरक्षण/प्रशासन- दुय्यम संवर्ग/ अर्थसंकल्प, नियोजन व विकास/ केंद्रस्थ अधिकारी/माहीती तंत्रज्ञान व प्रसिध्दी/योजना व्यवस्थापन-वन्यजीव), महाराष्ट्र राज्य नागपूर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.
**प्रतिलीपी:-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक सामाजिक वनीकरण पुणे यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.